# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
# कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
# ंजाहिर निविदा क्र. 01

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका यांचेकडून खालील तपशीलात नमूद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था, व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी शर्ती व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल, पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **1. कोरे निविदा प्रपत्र विक्री –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून सोमवार दिनांक 11/04/2011 पासून गुरुवार दिनांक 05/05/2011 पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **2. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक 06/05/2011 रोजी दुपारी 1.00 वाजे पर्यंत |
| **3. निविदा उघडण्याची वेळ** | शुक्रवार दिनांक 06/05/2011 दुपारी 3.00 वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. |
| **4. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे. |

5. शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे शैक्षणिक वर्ष 2011 – 12 अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशिल

| अ. क. | तपशील | तरतूद | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थी दप्तरे | 1 कोटी 25 लक्ष | 2,000/– |
| 2 | शालेय स्वच्छता साहित्य | 15 लक्ष | 2,000/– |
| 3 | शालेय किरकोळ साहित्य | 6 लक्ष | 1,000/– |
| 4 | विद्यार्थी गणवेश शिलाई | 1 कोटी | 2,000/– |

## सूचना

1. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा 1 टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी, स्पेसिफिकेशन, निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.
2. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील.
3. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

**शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफीकेशन सन 2011—12**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 07/05/2011**
**दुपारी 1 वाजेपर्यंत**
**विद्यार्थ्यांकरिता दप्तरे**
**बयाणा रक्कम 1,25,000/—**
**विद्यार्थी संख्या 83350**

शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांतील इ. 1 ली ते 7 वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळामार्फत रजिस्टर ट्रेडमार्क असलेल्या कंपनीच्या दप्तरे पुरविणाऱ्या पुरवठादारांनी / कंपन्यांनी दोन पाकीट पध्दतीने निविदा भरावयाची आहे. नामांकित दप्तरे उत्पादक कंपन्यांचे दप्तरे पुरविण्याबाबतचे अधिकार व नामांकनाबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

Tasted as per Specification provided by the party

| **Sr. No.** | **Chaeacteristies** | **Test Result** | |
|---|---|---|---|
| | | 15 inch | 17 inch |
| 1 | Made up | Virgin Plastic | Virgin Plastic |
| 2 | Denier | 600 x 600 DN Matty | 600 x 600 DN Matty |
| 3 | Zippers / Runners | 8” | 8” |
| 4 | Size | | |
| | a) Length | 15” | 17” |
| | b) Width | 5.5” | 6.5” |
| | c) Height | 10.5” | 11.5” |

SCHOOL BAGS OF 15” & 17” MADE UP OF SUPERIOR 600 X 600 DN MATTY WITH 8” NO ZIPPERS & RUNNERS. FRONT TWO POCKETS, SINGLE PARTISION, WATER BOTTLE POCKET & LOGO PRINTING. FITTING MADE UP OF VIRGIN PLASTICS. EACH BAG PACKED IN POLYTHENE BAG. ISO CERTIFIED COMPANY त्याबाबतचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडावे.

खालीलप्रमाणे इयत्तानुसार दप्तराचे दर देण्यात यावेत. दप्तरांचे प्रत्येकी तीन नमुने देणे आवश्यक आहेत. परंतू तपासणी फी प्रत्येक साईजनुसार खालीलप्रमाणे एका नमुन्याची भरणे आवश्यक आहे. प्रत्येक दप्तरांचे एका पेक्षा अधिक दर देऊ नयेत. निविदादारांनी नमुना तपासणी खर्च निविदा सादर करताना कर्यालयात चलनाने रोख भरणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे नमुने तपासणीकरिता पाठविले जाणार नाही व निविदा विचारात घेतली जाणार नाही. तसेच नमुन्याशिवाय निविदा स्विकारली जाणार नाही.

1. 15 इंची दप्तरे — इयत्ता 1 ली ते 4 थी नमुना तपासणी फी रू 4,000/— प्रत्येकी
2. 17 इंची दप्तरे — इयत्ता 5 वी ते 7 वी नमुना तपासणी फी रू 4,000/— प्रत्येकी

**प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी (मुले व मुली) एक दप्तर याप्रमाणे –**

1. 1 ली ते 4 थी करीता (15 इंची दप्तर)
2. 5 वी ते 7 वी करीता (17 इंची दप्तर)

(भारतीय मानक ब्युरो स्पेसिफिकेशनदर्जानुसार) सविस्तर स्पेसिफिकेशन सोबत जोडले आहे.

दप्तराचे दर सर्व करासह देण्यात यावेत. एका निविदा फॉर्ममध्ये साईजनुसार दर देण्यात यावा. बाजारभावाच्या छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही. दप्तराचे शाळावार वाटप करावे लागेल. योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर फॉर्ममध्ये स्पेसिफिकेशनबाबत काही शंका असल्यास, सांख्यिकी किंवा नकळत टंकलेखनामध्ये (टायपिंग) चूक झाली असल्यास संबंधित भांडारपालांशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा**

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
शिवाजी नगर, पुणे – 411005
परिशिष्ट ब
पुणे मनपा विद्यार्थी दप्तर संचाचे स्पेसिफिकेशन

## SPECIFICATIONS SCHOOL BAGS

**Size chart –**

| Sr. | Std | Length (inches) | Breadth (inches) | Height (inches) |
|---|---|---|---|---|
| 1 | I to IV | 15 | 5.5 | 10.5 |
| 2 | V to VII | 17 | 6.5 | 11.5 |

- Design and pattern of the School Bags have to be as per approved stores sample.
- Basic outer fabric should be matty 600 x 600 Denier. Lining partition of good quality PVC material should be used.
- Three ply polyester thread to be used for stitching.
- Foam of 4mm thickness to be incorporated into the shoulder strap.
- Pockets
    1. Two front pockets to be provided for school bags.
    2. One pocket to be provided on flap fastened with a zipper for school bags.
    3. One net pocket to be provided on side of the bag to hold suitable water-bottles in all sizes of school bags.
- School bags should be provided with a locking system consisting of two SR PVC pushing locks.
- Load with standing Capacity – School bags should be able to with stand loads of 5 kgs (minimum) upto 3000 jerks (minimum).

All the school bags supplied should be able to with stand the above defined testing procedure.

WATER BOTTLE

1. Size Chart

| Particulars | Std. 1st to 4th | Std. 5th to 7th |
|---|---|---|
| Capacity in ml min | 550 | 800 |

2. Design and pattern of the water bottles must be as per approved stores sample.
3. Material used for making water bottle must be made of FDA approved polyethylene for bottle.
4. Water bottle each to come with a kicker valve for easy drinking.
5. water bottle to have easy grip and leak-proof sealing cap for easy handling.
6. Water bottles to conform to EN71 standards in all other aspects.

स्वाक्षरी/–
अध्यक्ष,
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा

स्वाक्षरी/–
शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा

## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

## शिवाजी नगर, पुणे 411005

## दप्तरे पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती सन 2010–11.

1. **संदर्भ :–**

पुणे दैनिक लोकमत व पुण्यनगरी दि. 8/4/2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र. 1/भांडार/विद्यार्थी **दप्तरे** पुणे शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांमधील सर्व माध्यमाच्या इयत्ता 1 ली ते 7 वीच्या विद्यार्थ्यांसाठी दप्तरे पुरविण्याचेकामी **अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या खरेदी समितीने शैक्षणिक आर्थिक वर्ष 2011–12 चे करिता खालील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ट ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यालय स्पेसिफिकेशननुसार नमूद केलेल्या दप्तरांचे दर देण्यात यावेत.

निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

1. **अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे**

1) निविदा रकमेच्या शेकडा 1 टक्का या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅंकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (डी.डी.) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले, तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल, अन्यथा त्याला एसएसआय युनिट असले तरी सुध्दा बयाणा रकमा रोख भराव्या लागतील.

2) निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

3) आर्थिक वर्ष 2010 – 11 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2011 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

4) शासन, शासनअंगिकृत व इतर संस्थांना दप्तरे पुरविल्याबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

5) निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाणपत्राची (पॅन क्र.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

6) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासनअंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

7) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

8) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करण्यासंबधीची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रकमेचे अद्ययावत प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) आवश्यक आहे.

9) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष सादर कराव्या लागतील.

2. पाकीट **ब** मध्ये निविदा धारकाने साईज नुसार दप्तरांचे सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून त्यावर निविदा क्रमांक व निविदेचे नाव नमुद करून सादर करावा.

3. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास **ब** पाकीट उघडण्यात येणार नाही, याबाबत मा.शिक्षण मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे**

विहीत नमुन्यातील साईज निहाय दप्तरांचे दर सर्व करासह द्यावेत.

4. **निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

1. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. दप्तरांचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

2. निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा शिक्षण मंडळास राहील.

3. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

4. मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम

जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतून काही नुकसान झाल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5. मान्य निविदादारास करार करतेवेळी दप्तरे पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी)किंवा रोखीने भरावी लागेल.

6. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2011 – 12 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7. निविदा फॉर्मनुसार पाकिट **ब** मधील ज्या दप्तरांचे दर भरण्यात आलेले आहेत. त्यापैकी प्रत्येकी तीन नमूने निविदादाराने स्वखर्चाने निविदेसोबत द्यावयाचा आहे, सदर नमुना खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर नाही. नमूने दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.

8. बयाणा व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

9. दप्तरे पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास राहिल.

10. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशनप्रमाणे दप्तरे न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

11. करारनाम्यानुसार सर्व दप्तरांचा पुरवठा दिलेल्या मुदतीत जकातीच्या रकमेसह शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठीत करावा लागेल. त्यानंतर मा शिक्षण मंडळाची पाहणी झाल्यानंतर त्यातील काही नमुने शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी करून घेतले जातील. व तपासणीचा अहवाल सकारात्मक आल्यानंतरच ठेकेदाराने सदर दप्तरांचा पुरवठा शिक्षण मंडळाने दिलेल्या यादीनुसार प्राथमिक शाळांमध्ये पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर राहील.

12. प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालानुसार निविदादारानी पुरविलेली दप्तरे स्पेसिफिकेशननुसार नसतील तर, सदर दप्तरे निविदादाराने 10 दिवसांच्या आत शिक्षण मंडळ कोठीतून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू. 5000/– (अक्षरी रूपये पाच हजार फक्त) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही

13. पुरवठा केलेली सर्व दप्तरे मोजून, तपासून घेऊन दिलेल्या नमुन्याप्रमाणे सर्व असल्याची खात्री मा शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही, कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

14. निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा. शिक्षण मंडळ भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

15. एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

16. मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापुर्वी कोणलाही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा परतावा मागताना रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

17. निविदादाराने दप्तरे पुरविण्यास तयार झाली आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

18. दप्तरे पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

19. निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

20. मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या दप्तरांचे एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार दप्तरांचा पुरवठा करताना प्राप्त केलेली चलने संबधित शाळेचे नाव, शाळा क्रमांक, तारीख, मा. मुख्याध्यापकाचे स्वाक्षरी व

शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील व पुणे मनपाकडील जकात विभागाचे **ना हरकत प्रमाणपत्र** सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

21. मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र. द/675/ दि. 29/03/2011 अन्वये निविदा धारकाचे कुटूंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती निविदाधारकाने प्रतीज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहिल, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.
22. निविदा दि. 07/05/2011 रोजी दुपारी 3.00 वा. किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**पुणे.**

**दिनांकः—**

**स्वाक्षरी/—**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी/—**
**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा**

# प्रतिज्ञालेख

मी,श्री. ——————————————————————————— वय ——— वर्ष व्यवसाय — धंदा, राहणार ————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निविदा फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

**पुणे :—**

**दिनांक :—** **पुरवठा धारकाचे नाव,सही व शिक्का**

**शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका**
**सन 2011 – 12**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 7/5/2011**
**दुपारी 1 वाजेपर्यंत**
**शालेय स्वच्छता साहित्य स्पेसिफीकेशन**
**बयाणा रक्कम रूपये 15,000/–**
**परिशिष्ट ब**

शिक्षण मडळ, पुणे मनपाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय स्वच्छता साहित्य नामांकित कंपन्यांचे खरेदी करणेबाबत दोन पाकीट पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. खालील दिलेले साहित्य अंदाजे 300 शाळांकरिता प्रत्येकी एक नग याप्रमाणे खरेदी करावयाचे आहेत

1) **फिनेल** – सुगंधित ओरिजनल, (आरडब्लयूसी), 55 ग्रेड मर्क्युरी ब्रॅण्ड, जंतूनाशक टार ॲसिडचा अंश नसलेले, नॅचरल ऑईल व हर्बलयुक्त असावे, 5 लि. पॅकींग / प्लॅस्टीक कॅनचा दर देण्यात यावा.

2) **ॲसिड –** डायलूट केलेले नसावे, ओरिजनल हायड्रोक्लोरिक ॲसिड (प्रमाण 1:20) स्पेशली ग्लेझ टाईल्स व पिवळे डाग घालविण्यासाठी उपयुक्त असावे. (1 लि. व 5 लि. कॅनचा दर देण्यात यावा)

3) **ब्लिचिंग पावडर** – 33 टक्के क्लोरिनयुक्त स्ट्रॉंग पावडर (1/2 कि. व 1 कि. पॉलिथीन पॅकींग)

4) **खराटे** – चांगल्या बांधणीचे हार्ड, काडयांचे परंतू टॉयलेट स्वच्छतेसाठी उपयुक्त असावे. (50 नग काड्यांचा गठ्ठा) एका नगाचा दर द्यावा.

5) **लिक्वीड डिटर्जंट** – मल्टी परपज व लहान मुलांना हात धुण्यासाठी जंतूनाशक असावे. (1/2 लि. व 1 लि. बॅग)

6) **झाडू** – मकाईचे पॉलिश झाडे असावे चांगल्या बांधणीचेही असावे. एका नगाचा दर द्यावा.

7) **वायफर –** 16 इंच ॲल्युमिनियम बॉडी, तसेच व्हर्जिन रबर ब्लेड असावे, त्याची दांडी 3 ते 3 1/2 फुट लोखंडी मजबूत असावी त्याला रबर कोटींग असावे. (सिंगल सेट पॅकिंग) एका नगाचा दर द्यावा.

8) **वेट मॉप** – 6 इंच ब्लेड व त्याला किमान 12 इंच सुती दोरांचा लांब व 6 इंच रूंद असा बंच असावा त्याला ॲडजेस्टेबल हॅड रॉड किमान 3 फुटी असावा व लोखंडी पाईप प्लॅस्टिक कोटेड असावा. (सिंगल सेट पॅकिंग)

9) **टॉयलेट ब्रश** – प्लॅस्टिक अनब्रेकेबल एक्स्ट्रा हेवी डयुटी इझी ग्रीप असलेला हॅडल असावा, किमान 1 1/2 फुट लांब व दोन्ही बाजुला ब्रश करण्यासाठी त्याला दातेरे असावे. (सिंगल पॅकिंग) एका नगाचा दर द्यावा.

10) **बादल्या (प्लॅस्टीक)** – प्रथम दर्जाचे 15 लिटर उत्कृष्ट प्रतीचे असावे, एका नगाचा दर द्यावा

11) **प्लॅस्टीकचा मग** – प्रथम दर्जाचे 1 लिटर उत्कृष्ट प्रतीचे असावे, एका नगाचा दर द्यावा

**वरील सर्व साहित्याचे नमुने देणे आवश्यक आहे.**

सर्व शालेय स्वच्छता साहित्याचे दर सर्व करासह देण्यात यावेत. छापील किंमतीपेक्षा जास्त दराचा विचार केला जाणार नाही. शालेय स्वच्छता साहित्याचे शाळावार वाटप करावे लागेल. योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर फॉर्ममध्ये स्पेसिफिकेशनबाबत काही शंका असल्यास, सांख्यिकी किंवा नकळत टायपिंग चूक झाली असल्यास संबंधित भांडारपाल, यांचेशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ, पुणे महानरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ, पुणे महानरपालिका**

## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

## शिवाजी नगर, पुणे 411005

## शालेय स्वच्छता साहित्य पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती सन 2011 – 12.

1. **संदर्भ :–**

पुणे दैनिक लोकमत व पुण्यनगरी दि. 8/4/2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र. 1/भांडार/शिक्षण मडळ, पुणे मनपाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय स्वच्छता साहित्य खरेदी

शिक्षण मंडळ, पुणे मनपामार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय स्वच्छता साहित्य पुरविणेकामी **विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा अटी खालीलप्रमाणे :–**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या मा. शिक्षण मंडळ, पुणे मनपाने शैक्षणिक आर्थिक वर्ष 2011 – 12 चे करिता खालील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ट ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यालय स्पेसिफिकेशननुसार शालेय स्वच्छता साहित्याचे दर देण्यात यावेत.

निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून **अ** पाकीटामध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**1. अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

1) निविदा रकमेच्या शेकडा 1 टक्के दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे धनाकर्ष (डीडी) काढावा, किंवा इकडील कार्यालयात रोख भरणा करावा. दि. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस. एस. आय. युनिट असेल तरीसुध्दा बयाणा रक्कम भरावीच लागेल.

2) निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र (शॉपअॅक्ट लायसेन्स).

3) आर्थिक वर्ष 2010 – 11 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2011 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

4) शासन, शासनअंगिकृत व इतर संस्थांना शालेय स्वच्छता साहित्य पुरविलेबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

5) निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याची नोंदणी प्रमाणपत्र (पॅनकार्ड) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इन्कमटॅक्स रिटर्न प्रत.

6) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेच्या नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासनअंगिकृत संस्था असेल तर, त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

7) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

8) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करणेसंबधीची आर्थिक क्षमता असलेबाबतचे बॅंकेचे निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रक्कमेचे अद्ययावत प्रमाणपत्र (बॅंक सॉलव्हन्सी) आवश्यक आहे.

9) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती निविदा उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणी वेळी ठेकेदारांना समक्ष सादर कराव्या लागतील.

2. पाकीट **ब** मध्ये निविदाधारकाने सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून त्यावर निविदा क्रमांक व निविदेचे नाव नमूद करून सादर करावा.

3. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास **ब** पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा. शिक्षण मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे**

विहीत नमुन्यातील शालेय स्वच्छता साहित्याचे दर सर्व करासह द्यावेत.

4. **निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे –**

1) निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. शालेय स्वच्छता साहित्याचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

2) निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.

3) निविदेकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

4) मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 (सात) दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास

बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5) मान्य निविदादारास करार करतेवेळी शालेय स्वच्छता साहित्य पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी) किंवा रोखीने भरावी लागेल.

6) निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2011 – 12 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7) निविदा फॉर्मनुसार पाकिट **ब** मधील शालेय स्वच्छता साहित्य खरेदीबाबतचे दर भरण्यात आलेले आहेत. त्यापैकी प्रत्येकी तीन – तीन नमूने निविदादाराने स्वखर्चाने निविदेसोबत द्यावयाचे आहेत. सदर नमुने खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही नमुने दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.

8) बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

9) शालेय स्वच्छता साहित्य पुरविणेकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्यातील विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.

10) दिलेल्या मुदतीत व वेळेत स्पेसिफिकेशनप्रमाणे शालेय स्वच्छता साहित्य न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

11) करारनाम्यानुसार शालेय स्वच्छता साहित्याचा पुरवठा दिलेल्या मुदतीत जकातीच्या रकमेसह शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठीत करावा लागेल. त्यानंतर मा. शिक्षण मंडळाने पाहणी झाल्यानंतर शालेय स्वच्छता साहित्य शिक्षण मंडळाने दिलेल्या यादीनुसार पुरवठा करण्याची जबाबदारी निविदादारावर राहील.

12) शालेय स्वच्छता साहित्य कार्यालय स्पेसिफिकेशननुसार नसेल तर, सदरचे साहित्य निविदादाराने 10 दिवसांच्या आत स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रक्कम रूपये 1000/– (अक्षरी रक्कम रूपये एक हजार फक्त) याप्रमाणे जागा भाडे

आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास, संबधित मालाची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

13) कार्यालयीन कोठीमध्ये पुरवठा केलेले शालेय स्वच्छता साहित्य मोजून, तपासून घेऊन दिलेल्या नमुन्याप्रमाणे साहित्य असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कमेची मागणी करता येणार नाही. तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टीडीएसच्या रक्कमेची कपात केली जाईल.

14) एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही, एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल, तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

16) मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापुर्वी कोणलाही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा परतावा मागताना रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

17) निविदादाराने शालेय स्वच्छता साहित्य पुरविण्यास तयार असून, त्यासंबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा. शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

18) शालेय स्वच्छता साहित्य पुरविणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

19) निविदा एक किंवा अनेक निविदादारांना देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

20) मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या शालेय स्वच्छता साहित्याचे पुरवठयाचे एकत्रित देयक (बील) मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे इकडील कार्यालयात सादर करावे लागेल. शालेय स्वच्छता साहित्याचे शाळावार वाटप करताना प्राप्त केलेली चलने संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाचे नाव, स्वाक्षरी, तारीख व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी

लागतील, व पुणे मनपाकडील जकात विभागाचे **ना हरकत प्रमाणपत्र** सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत देयक अदा करणेबाबतची कार्यवाही केली जाणार नाही.

21) मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र. द/675/दि. 29/03/2011 अन्वये निविदा धारकाचे कुटूंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती निविदाधारकाने प्रतीज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहिल, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

22) निविदा दिनांक 7/5/2011 रोजी दुपारी 3.00 वाजता किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. त्यावेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्यादिवशी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीने कळविण्यात येईल. वेळी व प्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल. त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**पुणे**

| स्वाक्षरी/– | स्वाक्षरी/– |
|---|---|
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

# प्रतिज्ञालेख

मी, श्री/श्रीम ———————————————————————————— वय ——— वर्षे व्यवसाय – धंदा, राहणार ———————————————————————— (निविदादार) सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निविदा फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून, त्या सर्व अटी व शर्ती मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली असून, सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे स्वाक्षरी करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

**दिनांक :–**

**पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का**

**शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफीकेशन सन 2011 – 12**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 7/5/2011**
**दुपारी 1 वाजेपर्यंत**
**शालेय किरकोळ साहित्य**
**बयाणा रक्कम रूपये 6,000/–**
**परिशिष्ट ब**

शिक्षण मडळ, पुणे मनपाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय किरकोळ साहित्य नामांकित कंपन्यांचे खरेदी करणेबाबत दोन पाकीट पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. खालील दिलेले साहित्य अंदाजे 300 शाळांकरिता प्रत्येकी एक नग याप्रमाणे खरेदी करावयाचे आहेत

1) **पंचीग मशीन** – उत्कृष्ट प्रतीचे असावे. एक नगाचा दर देण्यात यावा.

2) **स्टेपलर** – 24/6 मोठे उत्कृष्ट प्रतीचे असावे, एक नगाचा दर देण्यात यावा.

3) **स्टेपलर पीना** – 24/6 20 पॅकेटचा 1 बॉक्स एक नगाचा दर देण्यात यावा.

4) **कॅल्क्युलेटर (गणकयंत्र)** – नामांकित कंपनीचे 12 डिजीटचे उत्कृष्ट प्रतीचे असावे, एका नगाचा दर देण्यात यावा.

5) **टॅग** – नामांकित कंपनीच्या उत्कृष्ट प्रतीचे 6 इंची असाव्यात. प्रती 100 नगांचा दर देण्यात यावा.

6) **डिंक** – 300 मि. लि. नामांकित कंपनीचे चांगल्या प्रतीचे असावे, एका नगाचा दर देण्यात यावा.

6) **प्लॅस्टीक ट्रे** – नामांकित कंपनीचे चांगल्या प्रतीचे असावे. एक नगाचा दर देण्यात यावा.

7) **टोच्या** – प्लास्टीक मुठीचा नामांकित कंपनीचे उत्कृष्ठ प्रतीचा असावा. एक नगाचा दर देण्यात यावा.

8) **टाचण्या** – नामांकित कंपनीचे उत्कृष्ठ प्रतीच्या असाव्या, एका बॉक्सचा दर देण्यात यावा.

9) **डस्टबीन** – नामांकित कंपनीचे उत्कृष्ठ प्रतीचे असावे. एक नगाचा दर देण्यात यावा.

10) **फर्स्ट एड बॉक्स – (सर्व साहित्यासह)** नामांकित कंपनीचे उत्कृष्ठ प्रतीचे असावा. एक बॉक्सचा दर देण्यात यावा, त्यातील औषधांची एक्सपायरी डेट जून, 2012 पर्यंत असावी.

11) **प्लॅस्टीक सुपली** – उत्कृष्ठ प्रतीची असावी. एक नगाचा दर देण्यात यावा.

12) **आयोडिन** – अधिकृत कंपनीचे 400 मि. लि.

13) **कापूस** – पांढरा शुभ्र – 500 ग्रॅम ग्रॅास वजन

**वरील सर्व साहित्याचे नमुने देणे आवश्यक आहे.**

सर्व शालेय किरकोळ साहित्याचे दर सर्व करासह देण्यात यावेत. छापील किंमतीपेक्षा जास्त दराचा विचार केला जाणार नाही. सर्व किरकोळ साहित्याचे शाळावार वाटप करावे लागेल. योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर फॉर्ममध्ये स्पेसिफिकेशनबाबत काही शंका असल्यास, सांख्यिकी किंवा नकळत टायपिंग चूक झाली असल्यास संबंधित भांडारपाल, यांचेशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ, पुणे महानरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ, पुणे महानरपालिका**

## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

## शिवाजी नगर, पुणे 411005

## शालेय किरकोळ साहित्य पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती सन 2011 – 12.

1. **संदर्भ :–**

पुणे दैनिक लोकमत व पुण्यनगरी दि. 8/4/2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र. 1/भांडार/शिक्षण मडळ, पुणे मनपाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय किरकोळ साहित्य खरेदी

शिक्षण मंडळ, पुणे मनपामार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांकरिता शालेय किरकोळ साहित्य पुरविणेकामी **विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा अटी खालीलप्रमाणे :–**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे यांनी आर्थिक शैक्षणिक वर्ष 2011 – 12 चे करिता खालील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ट ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यालय स्पेसिफिकेशननुसार शालेय किरकोळ साहित्याचे दर देण्यात यावेत.

निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून **अ** पाकीटामध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**4. अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

1) निविदा रकमेच्या शेकडा 1 टक्के दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे धनाकर्ष (डीडी) काढावा, किंवा इकडील कार्यालयात रोख भरणा करावा. दि. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस. एस. आय. युनिट असेल तरीसुध्दा बयाणा रक्कम भरावीच लागेल.
2) निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र (शॉपॲक्ट लायसेन्स).
3) आर्थिक वर्ष 2010 – 11 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2011 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.
4) शासन, शासनअंगिकृत व इतर संस्थांना शालेय किरकोळ साहित्य पुरविलेबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

5) निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याची नोंदणी प्रमाणपत्र (पॅनकार्ड) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इन्कमटॅक्स रिटर्न प्रत.

6) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेच्या नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासनअंगिकृत संस्था असेल तर, त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

7) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

8) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करणेसंबधीची आर्थिक क्षमता असलेबाबतचे बॅंकेचे निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रक्कमेचे अद्ययावत प्रमाणपत्र (बॅंक सॉलव्हन्सी) आवश्यक आहे.

9) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती निविदा उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणी वेळी ठेकेदारांना समक्ष सादर कराव्या लागतील.

5. पाकीट **ब** मध्ये निविदाधारकाने सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून त्यावर निविदा क्रमांक व निविदेचे नाव नमूद करून सादर करावा.

6. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास **ब** पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा. शिक्षण मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे**

विहीत नमुन्यातील शालेय किरकोळ साहित्याचे दर सर्व करासह द्यावेत.

4. **निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—**

1) निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. शालेय किरकोळ साहित्याचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

2) निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.

3) निविदेकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

4) मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 (सात) दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास

बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5) मान्य निविदादारास करार करतेवेळी शालेय किरकोळ साहित्य पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी) किंवा रोखीने भरावी लागेल.

6) निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2011 – 12 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7) निविदा फॉर्मनुसार पाकिट **ब** मधील शालेय किरकोळ साहित्य खरेदीबाबतचे दर भरण्यात आलेले आहेत. त्यापैकी प्रत्येकी तीन – तीन नमूने निविदादाराने स्वखर्चाने निविदेसोबत द्यावयाचे आहेत. सदर नमुने खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही नमुने दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.

8) बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

9) शालेय किरकोळ साहित्य पुरविणेकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्यातील विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.

10) दिलेल्या मुदतीत व वेळेत स्पेसिफिकेशनप्रमाणे शालेय किरकोळ साहित्य न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

11) करारनाम्यानुसार शालेय किरकोळ साहित्याचा पुरवठा दिलेल्या मुदतीत जकातीच्या रकमेसह शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठीत करावा लागेल. त्यानंतर मा. शिक्षण मंडळाने पाहणी झाल्यानंतर शालेय किरकोळ साहित्य शिक्षण मंडळाने दिलेल्या यादीनुसार पुरवठा करण्याची जबाबदारी निविदादारावर राहील.

12) शालेय किरकोळ साहित्य कार्यालय स्पेसिफिकेशननुसार नसेल तर, सदरचे साहित्य निविदादाराने 10 दिवसांच्या आत स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रक्कम रूपये 1000/– (अक्षरी रक्कम रूपये एक हजार फक्त) याप्रमाणे जागा भाडे

आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास, संबधित मालाची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

13) कार्यालयीन कोठीमध्ये पुरवठा केलेले शालेय थ्करकोळ साहित्य मोजून, तपासून घेऊन दिलेल्या नमुन्याप्रमाणे साहित्य असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कमेची मागणी करता येणार नाही. तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टीडीएसच्या रक्कमेची कपात केली जाईल.

14) एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही, एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल, तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

16) मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापुर्वी कोणलाही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा परतावा मागताना रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

17) निविदादाराने शालेय किरकोळ साहित्य पुरविण्यास तयार असून, त्यासंबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा. शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

18) शालेय किरकोळ साहित्य पुरविणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

19) निविदा एक किंवा अनेक निविदादारांना देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

20) मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या शालेय किरकोळ साहित्याचे पुरवठयाचे एकत्रित देयक (बील) मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे इकडील कार्यालयात सादर करावे लागेल. शालेय किरकोळ साहित्याचे शाळावार वाटप करताना प्राप्त केलेली चलने संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाचे नाव, स्वाक्षरी, तारीख व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी

लागतील, व पुणे मनपाकडील जकात विभागाचे **ना हरकत प्रमाणपत्र** सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत देयक अदा करणेबाबतची कार्यवाही केली जाणार नाही.

21) मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र. द/675/दि. 29/03/2011 अन्वये निविदाधारकाचे कुटूंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती निविदाधारकाने प्रतीज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहिल, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

22) निविदा दिनांक 7/5/2011 रोजी दुपारी 3.00 वाजता किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. त्यावेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्यादिवशी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीने कळविण्यात येईल. वेळी व प्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल. त्याकामी कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

पुणे

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

# प्रतिज्ञालेख

मी, श्री/श्रीम ———————————————————————————— वय ——— वर्षे व्यवसाय – धंदा, राहणार ——————————————————————————— (निविदादार) सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निविदा फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून, त्या सर्व अटी व शर्ती मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली असून, सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे स्वाक्षरी करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

दिनांक :–

पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन 2011 – 12**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 7/5/2011**
**वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत**
**बयाणा रक्कम रुपये : 1,00,000/–**
**विदयार्थी संख्या अंदाजे – 98713**
**विद्यार्थी गणवेश शिलाईचे स्पेसिफिकेशन**

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील सर्व माध्यमाच्या बालवाडी व इयत्ता 1 ली ते 7 वी च्या विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी गणवेश शिलाईचे स्पेसिफिकेशन खालीलप्रमाणे –

| क्र. | तपशील | |
|---|---|---|
| 1 | शिलाई स्पेसिफिकेशन | पॅन्ट व पिनोफ्रॉक, कुर्ता करिता लागणारा दोरा 100 टक्के स्पन पॉलिस्टर. शर्ट व सलवारकरिता लागणारा दोरा पॉलिस्टर कॉटन कोअर स्पन पॉलीश वापरावा. |
| 2 | कॉलर कॅनव्हास | मायक्रो डॉट फ्युजविल इंटरलायनिंग |
| 3 | चेन | क्लोज एण्डेड नायलॉन कॉईल चेन साईज 45 सी एफ (रूंद) |
| 4 | बटन्स | चार होल क्लिअर कलर असलेले युरिया रेझीन अॅक्रोलिक नायलॉन बटन |
| 5 | खिसे | 100 टक्के कॉटन पांढरे मर्सिलाईज्ड कापड (आतील भागास) व बाहेरील भागास त्याच कापडाच्या रंगाचे असावे. |
| 6 | ओव्हर लॉक | 5 धाग्यांची शिवण/5 एम एम चे 13 टाके असावेत. |
| 7 | शिवण | प्रत्येकी 1 इंचामध्ये 9 ते 10 टाके असावेत. |
| 8 | ओढणी | पिको केलेली असावी. |
| 9 | इस्त्री | शिलाई केलेले गणवेश इस्त्री करुन द्यावेत. |
| 10 | पॅकींग | साईज व इयत्तानुसार गणवेश मुला मुलींचे वेगवेगळे 25 च्या गठ्ठ्यात देण्यात यावेत. |
| 11 | लोगो | शर्टच्या खिशाला व पिनोफ्रॉकच्या डाव्या बाजुस शिक्षण मंडळाच्या नावाचा लोगो कार्यालय नमुन्यानुसार लाल रंगाच्या दोऱ्याने एम्ब्रॉयडरी करणे आवश्यक आहे. |

2/–

सुचना –

1. गणवेशाची शिलाई उत्तम प्रतीची असावी.
2. पॅन्ट–शर्ट, पिनोफ्रॉक, सलवार–कुर्ता–ओढणी यांचे गणवेश शिलाईचे प्रत्येकी दोन नमुने निविदेसोबत देणे आवश्यक आहे, त्याशिवाय निविदा उघडली जाणार नाही.
3. विद्यार्थी गणवेश साईजचा तक्ता सोबत जोडलेला आहे. वरील क्र. 1 ते 11 मधील सर्व साहित्यासह शिलाईचे इयत्ता व साईजनुसार वेगवेगळे दर देण्यात यावेत.
4. निविदादारांने प्रत्येक पॅन्ट–शर्ट, पिनोफ्रॉक, सलवार कुर्ता ओढणी शिलाई गणवेशाची नमुना तपासणी खर्चापोटी खालीलप्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे

1. हाफ पॅन्ट फूल इलॅस्टिकची – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
2. हाफ पॅन्ट हाफ इलॅस्टिकची – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
3. शर्ट – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
4. पिनोफ्रॉक – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
5. सलवार – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
6. कुर्ता – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–
7. ओढणी – एका नमुन्यासाठी तपासणी फी रक्कम रूपये – 2,000/–

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

# विद्यार्थी गणवेश साईज तक्ता

## सन 2011 – 12

पिनोफ्रॉक – कॉलर व बाहीसाठी टेरीकॉट शर्टींग क्रीम कलर व बॉडीकरिता टेरीकॉट सुटींग चॉकलेटी कलर

**.अ) पिनोफ्रॉक**

| इयत्ता | अंदाजे साईज | उंची सेमी | शरीर सेमी | छाती सेमी | शोल्डर सेमी | बाही सेमी | दंडघेर सेमी | गळा सेमी | पाठी मागे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बालवाडी | 24 | 63 | 28 | 69 | 28 | 15 | 20 | 28 | 3 बटन |
| 1 ली | 26 | 67 | 30 | 72 | 29 | 16 | 22 | 29 | 3 बटन |
| 2 री | 28 | 73 | 33 | 77 | 30 | 17 | 23 | 30 | 3 बटन |
| 3 री | 30 | 78 | 34 | 80 | 32 | 19 | 25 | 31 | 4 बटन |
| 4 थी | 32 | 82 | 36 | 84 | 34 | 21 | 28 | 32 | 4 बटन |
| 5 वी | 34 | 85 | 38 | 88 | 36 | 23 | 31 | 33 | 5 बटन |
| 6 वी | 36 | 88 | 40 | 92 | 38 | 25 | 34 | 34 | 5 बटन |
| 7 वी | 38 | 91 | 42 | 96 | 40 | 26 | 36 | 35 | 6 बटन |

**ब) सलवार – चॉकलेटी टेरीकॉट शर्टींग** उजव्या बाजूला खिसा असणे आवश्यक आहे.

| इयत्ता | अंदाजे साईज | उंची इंच | कंबर इंच | बॉटम इंच |
|---|---|---|---|---|
| 5 वी | 32 | 32 | 36 | 15 |
| 6 वी | 34 | 34 | 38 | 16 |
| 7 वी | 36 | 36 | 40 | 18 |

खाली दिड इंचाची पट्टी कॅनव्हाससह, कंबरेसह नाडी,

**क) कुर्ता क्रीम कलर टेरीकॉट शुटींग**

| इयत्ता | अंदाजे साईज | उंची इंच | छाती इंच | बाही इंच |
|---|---|---|---|---|
| 5 वी | 32 | 32 | 36 | 8.5 |
| 6 वी | 34 | 34 | 38 | 9 |
| 7 वी | 36 | 36 | 40 | 9.5 |

पाठीमागे साईजनुसार 3 ते 4 बटन लावणे,

**ड) ओढणी दोन वार लांबीची पिको केलेली असावी.**

**इ) हाफ शर्ट**

| इयत्ता | अंदाजे साईज | उंची सेमी | छाती सेमी | शोल्डर सेमी | बाही सेमी | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाडी | 4/5 | 49 | 73 | 30 | 17 | नायलॉन जाड बटन कॉलर सव्वा दोन इंच कॉलरसह पाच बटन |
| 1 ली | 5/6 | 52 | 76 | 32 | 18 | |
| 2 री | 7/8 | 55 | 78 | 34 | 19 | |
| 3 री | 9/10 | 60 | 82 | 36 | 20 | |
| 4 थी | 10/11 | 63 | 84 | 38 | 20 | नायलॉन जाड बटन कॉलर सव्वा दोन इंच कॉलरसह सहा बटन |
| 5 वी | 11/12 | 65 | 86 | 38 | 22 | |
| 6 वी | 13/14 | 68 | 88 | 40 | 23 | |
| 7 वी | 15/16 | 70 | 90 | 42 | 25 | |

वरील शर्टाच्या डाव्या बाजुला एक खिसा लावणे आवश्यक आहे

## ई) हाफ पॅन्ट

| इयत्ता | अंदाजे साईज | उंची सेमी | कंबर सेमी | सीट सेमी | बॉटम सेमी | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाडी | 4/5 | 28 | 57 | 70 | 40 | 4/5 या साईजकरिता फुल इलास्टीक देणे तसेच उर्वरित साईजकरिता हाफ पॅन्टला हाफ इलास्टीक कटबेल्ट चैन व हुक/ पाच लुप्स असावेत<br><br>पॅन्टचे दोन्ही बाजूस खिसे असावेत. |
| 1 ली | 5/6 | 31 | 60 | 74 | 42 | |
| 2 री | 7/8 | 34 | 63 | 78 | 45 | |
| 3 री | 9/10 | 36 | 66 | 82 | 48 | |
| 4 थी | 10/11 | 38 | 68 | 84 | 51 | |
| 5 वी | 11/12 | 40 | 70 | 86 | 53 | |
| 6 वी | 13/14 | 42 | 70 | 88 | 53 | |
| 7 वी | 15/16 | 44 | 72 | 90 | 55 | |

विदयानिकेतन च्या विदयार्थ्यांकरिता पिनोफ्रॉकसाठी कमरेला बेल्ट व पिनोफ्रॉक व हाफ पॅटच्या खिश्याकरिता 100 टक्के कॉटन पांढरे मर्सिलाईज्ड कापड वापरावे हाफ पॅन्टची खालची पट्टी सव्वा इंच पाहिजे ओढणीला पिको करणे आवश्यक आहे, तसेच पॅट–शर्ट, पिनोफ्रॅक व सलवार कुर्ता या संपुर्ण ड्रेसला डबल शिलाई करुन ओव्हरलॉक करणे आवश्यक आहे

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे 411005
# गणवेश शिलाई करुन देणेबाबत निविदा अटी व शर्ती 2011 – 12.

1. संदर्भः–

पुणे दैनिक लोकमत व पुण्यनगरी दि. 08/04/2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र. 1/भांडार/ गणवेश शिलाई करुन देणेबाबत –

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिकेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता गणवेश शिलाई करुन देणेबाबत **विहीत नमुन्यातील निविदाफॉर्म व निविदाअटी खालीलप्रमाणे**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका, पुणे यांनी शैक्षणिक आर्थिक वर्ष 2011 – 12 चे करिता खालील **परिशिष्ठ अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ठ ब** मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थी गणवेशाची शिलाई विशिष्ट मुदतीत करुन देणेबाबत निविदा अटी, शर्ती व स्पेसिफिकेशन खालीलप्रमाणे –

**परिशिष्ठ अ**

2. <u>अटी व शर्ती</u> :–

1) निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदाआली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
2) निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

3. <u>अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे</u> :–

1) निविदा रकमेच्या शेकडा 1 टक्का या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) कार्यालयात चलनाने समक्ष भरावा. दि. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघु उद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस. एस. आय. युनिट असले तरीसुध्दा बयाणा रकमा रोख भराव्या लागतील.
2) निविदादाराचे संस्था नोंदणी (शॉप ॲक्ट) केलेले अद्ययावत प्रमाणपत्र
3) आर्थिक वर्ष 2010 – 11 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2011 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

4) शासन / शासन अंगिकृत व इतर संस्थांना विद्यार्थी गणवेश शिलाई करुन दिल्याबाबत अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

5) निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (पॅन क्र.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न प्रत.

6) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदांरांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

7) व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

8) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करणेसंबधी आर्थिक क्षमता असलेबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) चालू वर्षाची निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रकमेचे आवश्यक आहे

9) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष सादर कराव्या लागतील.

4. पाकीट **ब** मध्ये निविदाधारकाने बाबनिहाय सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून, त्या पाकीटावर निविदाधारकाचे नाव, निविदा क्रमांक नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

5. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास **ब** पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

6. **ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे –**

विहीत नमुन्यातील बालवाडी व इयत्ता 1 ली ते 7 वीच्या विद्यार्थ्यासाठी हाफ पॅण्ट, हाफ शर्ट, इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विद्यार्थिनींसाठी पिनोफ्रॉक व इयत्ता 5 वी ते 7 वीच्या विद्यार्थिनींसाठी सलवार कुर्ता व इंग्रजी माध्यमाच्या बालवाडी व इ. 1ली ते 7वी च्या मुलींकरिता पिनोफ्रॉक गणवेश शिलाई करुन देणेबाबतचे दरपत्रक सर्व करासह द्यावेत.

7. **निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती**

1) निविदेतील दर स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेले असावेत. कार्यालय स्पेसिफिकेशननुसार गणवेश शिलाई करुन देणेबाबतचे दर इयत्तानिहाय अंकी व अक्षरी लिहावेत.

2) योग्य कारणावरून निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा पुर्ण अगर अंशतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहील.

3) निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.

4) मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 (सात) दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5) मान्य निविदादारास करार करतेवेळी गणवेश शिलाई करुन देणेबाबतच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) किंवा रोखीने भरावी लागेल.

6) निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2011 – 12 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7) बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

8) गणवेश शिलाई करुन देणेकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.

9) दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशनप्रमाणे गणवेश शिलाई करुन देणेची सुविधा न पुरविल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल. करारनाम्यानुसार सर्व गणवेशांचा पुरवठा दिलेल्या मुदतीत जकातीच्या रकमेसह शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठीत करावा लागेल. गणवेश शिलाईची तपासणी केल्यानंतर व मा शिक्षण मंडळाची पाहणी झाल्यावर गणवेशाची शिलाई कार्यालय स्पेसिफिकेशनुसार असल्याची खात्री झाल्यानंतरच मनपाच्या प्राथमिक शाळांमध्ये गणवेशांचे वाटप करावे लागेल.

10) गणवेश शिलाई तपासणी करुन दिलेल्या नमुन्याप्रमाणे गणवेश शिलाई करुन दिलेबाबतची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल (देयक) मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही. तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टी. डी. एस.च्या रकमेची कपात केली जाईल.

11) एकदा भरलेली निविदा रद्द करता येणार नाही एखाद्याला ती जर रद्द करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील, तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

12) मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

13) निविदादाराने विद्यार्थी गणवेशाची शिलाई करण्यात आलेली असून, त्यासंबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा. शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

14) गणवेशाच्या शिलाईबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

15) गणवेश शिलाई करुन देणेबाबत निविदा एकास/अनेकांस देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

16) गणवेश शिवून तयार झाल्यानंतर त्याची मा. शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. गणवेशाची शिलाई विहित नमुन्यात आहे किंवा नाही हे पाहिले जाईल. खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे शिलाई नसलेल्या गणवेशाची शिलाई पुन्हा करुन द्यावी लागेल.

17) निविदादाराचे गणवेशाचे शिलाईबाबत, शिलाईचे स्पेसिफिकेशनबाबत काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी सक्षम प्रयोगशाळेकडून करण्यात येईल. व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहिल.

18) मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या गणवेशांचे एकत्रित देयक मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल शाळावार गणवेशाचा पुरवठा

करताना प्राप्त केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील

19) **निविदा 7/5/2011 रोजी दुपारी 3 वाजता** किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीवरुन कळविण्यात येईल. त्यावेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

20) मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र. द/675/ दि. 29/03/2011 अन्वये निविदा धारकाचे कुटूंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती निविदाधारकाने प्रतीज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहिल, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

21) महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय परिपत्रक क्र भांखस/यंत्रमाग (हातमाग कापडाशिवाय/दरनिश्चिती/(26) दि. 19/07/2008 निर्णयातील दि. 09 जुलै 2008 मधील क्र. 25 नुसार गणवेश शिलाईबाबत महिला संस्थांचा विचार केला जाईल.

**पुणे**

**दिनांकः—**

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/—** | **स्वाक्षरी/—** |
| **अध्यक्ष,** | **शिक्षणप्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** | **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** |

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————————————वय————वर्ष

व्यवसाय — धंदा, राहणार ——————————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निवीदेच्या, फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच

निविदाभरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

पुणे :–

दिनांक :– **पुरवठा धारकाची नाव, सही व शिक्का**